FORM-1A N.C.R.B.

I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154212

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ॲ.सी.बी., पहिली खबर क्र. FIR No. 04, वर्ष Year 2022, दिनांक Date 02/02/2022

2. (i) अधिनियम Act ला.प्र.का. 1988, कलमे Sections कलम 13(1)(ई), 13(1)(ब)
(ii) अधिनियम Act ..., कलमे Sections सह कलम 13(2)
(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार ..., तारीख पासून जानेवारी 2004 वेळ ..., तारीख पर्यंत 16-02-2021 वेळ ...
Occurrence of offence : Day Date from Time Date to Time
वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
(1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
(6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 15-03-2021, वेळ Time ...
(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 25/2022, तारीख Date 02-02-2022 वेळ Time 18:00 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral ...

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव मुंबई, ठिकाणाचे नंबर ..., गल्ली ..., रस्त्याचे नाव ...
Address of Occurrence Name No. if any Ward Name of road
जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण ..., गाव ..., पोस्ट ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
Nearest identifiable place Village Post Taluka Dist. State
(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव ..., तालुका ..., जिल्हा ..., राज्य ...
In case, outside the limit of this Police Station Taluka Dist. State

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
(a) नाव Name शिवराज म्हेत्रे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name जगदिश म्हेत्रे
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 40 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 8355901447
(e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation नोकरी
(g) धर्म Religion हिंदु जात Caste ..., जनजात Sub-Caste ...
(h) पत्ता Address : 02/12, गल्ली / सेक्टर नं. Ward शाहू सोसायटी, घर / नाव नं. House/Name No. दादर पोलीस वसाहत ..., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..., पॅन नं. PAN No. ..., वोटर्स नं. Card No. ...
रस्त्याचे नाव Road डॉ. ए.बी. मरकर मार्ग, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place दादर (प), गाव Village ..., पोस्ट Post ..., पो. स्टे. P. Stn. ...
तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address - वरीलप्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)

नितीन गणपत पाटणकर, वय 44 वर्षे, रा. ठि. बी/603, आरियन टॉवर, नॅशनल शाळेजवळ, भट्टीपाडा रोड, भांडूप (पश्चिम), मुं 400078.

Y.P.P.-600 Reg.-(25×6=150 Lvs.)-2-2018-PA3-(K) 829

Scanned by Scanner Go

यातील फिर्यादी श्री शिवराज जगदीश म्हेत्रे, वय - 40 वर्ष, धंदा :- नोकरी (सपोआ, लाप्रवि, मुंबई) व.हि. मागील नमुद प्रमाणे यांचा स्वतंत्र कागदावर नोंदविण्यात आलेला संगणिकृत जबाब हाच प्रथम खबर समजण्यात यावा.

समक्ष

[illegible] 22

(नितीन प्रभाकर ठकवी)
स.पो.आ.
का.प्र.वि.,
मुंबई विभाग.

[illegible]

(शिवराज ज. म्हेत्रे)
सपोआ लाप्रवि, मुंबई विभाग.

Scanned by Scanner Go

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ त्वरित ( चौकशीतरून दाखल )

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (अ) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ ज्ञात उत्पन्नाच्या विसंगत 44.76% (रु.38,29,225/-)

Total Value of properties stolen / involved

(ब) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद तारीख, वेळी व ठिकाणी बाजूस नमूद लोकसेवक आरोपी यांनी दिनांक जानेवारी 01-01-2004 ते 16-02-2021 या कालावधीत त्यांच्या ज्ञात उत्पन्नापेक्षा रु. 38,29,225/- म्हणजे (44.76%) इतकी अपसंपदा बाळगली असल्याने त्यांचे विरुद्ध कलम. भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 13(1)(ई) व कलम 13(1)(ब) सह कलम 13(2) प्रमाणे गुन्हा नोंद.

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

नितीन प्रभाकर दळवी, सपोआ, लाप्रवि मुंबई विभाग

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........

District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

[signature] 2/2/2022

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature] 2/2/22

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name नितीन प्रभाकर दळवी

पदनाम Rank सपोआ, लाप्रवि, मुंबई विभाग

तपासिक अं. चा कोड क्र. ........

Posting

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख 03-02-2022

1. Date and time of submitted to the Court.

Code No. of I. O. ........

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned by Scanner Go

## फिर्याद

श्री शिवराज जगदिश म्हेत्रे वय– ४० वर्षे, व्यवसाय – नोकरी, सहाय्यक पोलीस आयुक्त, अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग, सर पोचखानावाला रोड, वरळी मुंबई –३०, रा.ठि. ०२/१२, दादर पोलीस कॉलनी, व्ही.एस. मटकर मार्ग, दादर (प), मुंबई – ४०००२८, मो. क्रं. ८३५५९०१४४७. दिनांक – ०२/०२/२०२२.

– – –

मी वरील प्रमाणे असुन दिनांक मार्च २०२१ रोजी पासुन मी मुंबई विभाग येथे एक टप्पा पदोन्नतीवर सहाय्यक पोलीस आयुक्त म्हणून कार्यरत आहे.

ला. प्र. वि. मुंबई विभाग येथे गैरअर्जदार लोकसेवक श्री.नितीन गणपत पाटणकर वय ४६ वर्षे, धंदा–नोकरी, अनुज्ञापन निरीक्षक , पी/ उत्तर वॉर्ड, मालाड (पश्चिम), मुंबई – ६४, यांचेवर गु. र. क्रं. ०६/२१, कलम ७,१२, भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असुन त्यात त्यांना अटक करण्यात आली होती. सदर गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने लोकसेवक यांचे निवासस्थान आरियल टॉवर, बी विंग, फ्लॅट नं.६०३, नॅशनल स्कुल जवळ, भांडूप (पश्चिम), मुंबई–४०००७८ या घराची दि. १५/०२/२१ रोजी दोन पंचासमक्ष घरझडती घेतली असता घरझडतीमध्ये स्थावर व जंगम मालमत्तेबाबत कागदपत्रे मिळून आल्याने मा. अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी त्यांचेविरूध्द उघड चौकशी सुरू करण्याबाबत जा. क्रं. ४१०३/लाप्रवि/बीएमयु/उचौक्र. १७/२०२१, दि. १५/०३/२०२१ रोजी अन्वये उघड चौकशी क्रं. १७/२१ च्या चौकशीकामी मा. वरीष्ठांनी आमची (सपोआ म्हेत्रे) नियुक्ती केली.

चौकशीचे आदेश प्राप्त होताच आम्ही नमुद उघड चौकशीचा मा. वरीष्ठांना कृती आराखडा सादर केला व उघड चौकशीचा परिक्षण कालावधी ०१/०१/२००४ ते १६/०२/२०२१ असा ग्राहय धरण्यात आला आहे. तसेच गैरअर्जदार यांचेकडुन मत्ता व दायित्वाचे १ ते ६ फॉर्म व स्वयंघोषणा पत्र भरून घेतले. तसेच गैरअर्जदार यांचे स्थावर व जंगम मालमत्ते बाबत माहिती मिळुन येईल अशा विविध शासकीय आस्थापनांना पत्रव्यवहार केला. गैरअर्जदार व संबंधीत व्यक्तींचे जबाब नोंद करण्यात आलेले आहेत. गैरअर्जदार व इतर व्यक्तींचे जबाब याद्वारे तसेच विविध आस्थापनांकडुन प्राप्त माहिती खालीलप्रमाणे :–

**गैरअर्जदार व त्यांचा कौटुंबिक इतिहास खालील प्रमाणे.**

**कौटुंबिक इतिहास:–**

गैरअर्जदार नितीन गणपत पाटणकर २००४ पासून बी/६०३, आरियल टॉवर, नॅशनल शाळेजवळ, भट्टीपाडा रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई नं:– ४०००७८. येथे ते त्यांची पत्नी सौ. ज्योती नितीन पाटणकर वय ४४ वर्षे, मोठा मुलगा नामे प्रेम नितीन पाटणकर वय १८ वर्षे, मुलगी नामे कुमारी. स्वरा नितीन पाटणकर, वय १० वर्षे यांचेसह राहतात.

गैरअर्जदार यांचा जन्म दि. २७/०१/१९७६ रोजी भांडूप, मुंबई येथे झाला. गैरअर्जदार यांना एक बहीण व एक भाउ आहे.गैरअर्जदार यांचा मोठा भाऊ नामे सतिश गणपत पाटणकर वय ४९ वर्षे हे त्याची पत्नी श्रीमती नयना सतीश पाटणकर वय ४७ वर्षे, मुलगा नामे अभिषेक वय १८ वर्षे व आर्यन वय १३ वर्षे यांच्यासह फ्लॅट नं. ७०३, एवॉन बिल्डींग, ७ वा माळा, हिरानंदानी को. ऑप. हौ. सोसा, घोडबंदर रोड, पाटलीपाडा, ठाणे येथे राहावयास आहे. त्याचे सन २००१ ला लग्न झाले असून ते एच.पी.सी.एल कंपनी मध्ये १९९६ पासून इंजीनियर म्हणून नोकरीस लागले असुन सध्या ते एचपीसीएल, भायखळा येथे व्यवस्थापक म्हणुन काम करत आहे. त्यांची पत्नी नयना या गृहिणी असुन मुले शिक्षण घेत आहेत.

समक्ष (signature) २/२/२२

(signature) (शिवराज ज. म्हेत्रे) सपोआ, लाप्रवि, मुंबई

Scanned by Scanner Go

गैरअर्जदार यांची मोठी बहिण नामे गीता गणपत पाटणकर वय ५० वर्षे, धंदा– गृहिणी (लग्नानंतरचे नाव कोमल अनिल सावर्डेकर) असे असून सन २००० मध्ये त्यांचे लग्न अनिल कृष्णा सावर्डेकर यांचेसोबत झाले असुन सध्या त्या त्यांचे पती अनिल सावर्डेकर वय ५१ वर्षे, मुलगे नामे तेजस २१ वर्षे व करण १८ वर्षे यांचेसह रूम नं. ४०१, ४ था माळा, आनंद सोसा. टाटा कॉलनी, नवघर रोड, मुलुंड (पु) मुंबई येथे राहावयास आहे. त्यांचे पती रिक्षा चालक असुन दोन्ही मुले शिक्षण घेत आहेत.

गैरअर्जदार यांचे ०१ ते ०४ पर्यतचे शिक्षण शिवाजी नगर म्युनसिपल शाळा, भांडूप (पश्चिम) येथे झाले. त्यानंतर ०५ ते ०७ पर्यतचे शिक्षण टॅक रोड, म्युनसिपल शाळा, भांडूप, (पश्चिम), त्यानंतर ०८ ते १० पर्यंतचे शिक्षण नवजीवन हायस्कुल, भांडूप (पश्चिम) त्यानंतर ११ वी ते १५ वी (बीए) पर्यतचे शिक्षण नॅशनल कॉलेज, भांडूप (पश्चिम) येथे झालेले आहे.

गैरअर्जदार यांचे लग्न श्री. शांताराम बापू सावंत राठीः– रूम नं. ३२, विश्वकर्मा सदन चाळ, भांडूप पोलीस चौकी जवळ, टेंभीपाडा रोड, भांडूप (पश्चिम), मुंबई नं. ४०००७८ यांची कनिष्ठ कन्या ज्योती शांताराम सावंत यांच्याशी १४/०५/२००२ रोजी बांद्रा कोर्टमध्ये रजिस्टर पध्दतीने झाले. गैरअर्जदार यांचे सासरे शिवडी रूग्णालय येथे लॅब टेक्निशीयन या पदावर कार्यरत होते. ते सन १९९२ रोजी सेवानिवृत्त होवून दि.२६/०२/२००३ रोजी मयत झाले आहे. तसेच त्यांची सासू नामे ललीता शांताराम सावंत हया गृहिणी होत्या. त्या साधारण जुलै २०१८ रोजी मयत झाल्या आहेत. गैरअर्जदार यांना सुरेश शांताराम सावंत धंदा – नोकरी, रा.ठि. दहीसर ; सदानंद शांताराम सावंत धंदा – नोकरी रा.ठि. भांडुप, सत्यवान शांताराम सावंत धंदा – नोकरी, रा.ठि. भांडुप असे ३ मेव्हणे आहेत तसेच श्रीमती सुलेशा दत्ताराम पेडणेकर, श्रीमती अक्षता विनोद घाग, श्रीमती सुवर्णा मंगेश घाग अशा तीन मेव्हण्या असुन ते सर्व विवाहीत आहेत.

गैरअर्जदार यांना मोठा मुलगा व लहान मुलगी आहे. मुलाचे नाव प्रेम नितीन पाटणकर वय १८ वर्षे, धंदा–शिक्षण, मुलाचे ०१ ली ते १० वी पर्यतचे शिक्षण पवार पब्लिक स्कुल भांडूप (पश्चिम) येथे झाले असुन सध्या ११ वी चे शिक्षण नॅशनल कॉलेज, भांडूप (पश्चिम) येथे घेत आहे. मुलगी नामे स्वरा नितीन पाटणकर वय १० वर्षे, धंदा–शिक्षण, मुलगी इयत्ता ०४ थी मध्ये पवार पब्लिक स्कुल भांडूप (पश्चिम), येथे शिक्षण घेत आहे.

गैरअर्जदार यांचे मुळ गाव खारेपाटण, मु.पो. पन्हाळे, चव्हाणवाडी, तालुका–राजापूर, जिल्हा–सिंधुदुर्ग असे असून त्यांच्या मुळ गावी वडिलोपार्जित, स्वतःच्या नावे किंवा त्यांचेवर अवलंबून असणाऱ्याच्या नावे कोणत्याही प्रकारची स्थावर किंवा जंगम मालमत्ता नाही. गैरअर्जदार यांच्या वडीलांना दोन भाउ व एक बहीण आहेत. श्री. दत्तात्रय बाळा पाटणक व श्री. शंकर बाळा पाटणकर. श्री. दत्तात्रय बाळा पाटणक हे मयत झाले. श्री. शंकर बाळा पाटणकर वय ८० वर्षे हे मुंबई मध्ये रहावयास आहे. गैरअर्जदार यांना अशोक दत्तात्रय पाटणकर वय ६० वर्षे, धंदा – नोकरी, रा. ठि. वडाळा, मुंबई ; शशी दत्तात्रय पाटणकर वय ५५ वर्षे, धंदा – नोकरी, रा. ठि. बदलापुर ; शैलेंद्र शंकर पाटणकर, वय ५० वर्षे, धंदा – नोकरी, रा.ठि. मुलुंड ; महेंद्र शंकर पाटणकर वय ४७ वर्षे, धंदा – नोकरी, रा. ठि. जोगेश्वरी, मुंबई असे ०४ चुलत भाउ आहेत.

समक्ष
लिहून घेतला
समक्ष

शिवराज ज. म्हेत्रे

Scanned by Scanner Go

**नोकरीचा इतिहास :—**

गैरअर्जदार यांचे वडील श्री. गणपत बाळा पाटणकर हे बृहन्मुंबई महानगरपालिका, ''ए'' वॉर्ड, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स येथे लिपीक म्हणून १९६४ रोजी नोकरीस लागले होते, त्यांच्या वडीलांचे दि. १५/१०/१९७९ मध्ये निधन झाले त्यावेळी ते कर संचालन व निर्धारण खाते, बीएमसी मुख्यालय येथे निरीक्षक म्हणुन कार्यरत होते. त्यांचे वडिल मयत झाल्यानंतर त्यांची आई १९८२ मध्ये अनुकंपातत्वार उच्च प्राथमिक म्युनसिपल शाळा, तुलशेत पाडा, भांडूप येथे शिपाई म्हणून कामाला लागल्यागैरअर्जदार यांची आई सौ. शारदा गणपत पाटणकर हया दि.०६/०९/१९९५ रोजी मयत झाल्या. त्यांच्या मृत्युनंतर गैरअर्जदार हे दि २५/१०/१९९६ रोजी अनुकंपा तत्वावर बृहन्मुंबई महानगर पालिकामध्ये लिपीक म्हणून नोकरीस लागले. गैरअर्जदार यांनी सन २००८ साली खात्याअंतर्गत अनुज्ञापन निरिक्षक ही परिक्षा देवून त्यांची अनुज्ञापन निरिक्षक म्हणून नेमणूक होवून अनुज्ञापन खाते मुख्यालय दादर येथे त्यांची बदली झाली. अनुज्ञापन निरीक्षक अंतर्गत वाहन निरीक्षक, जाहीरात निरीक्षक, ट्रेड निरीक्षक अशा तीन पदावर काम करावे लागते. त्यानुसार गैरअर्जदार सध्या जाहीरात निरीक्षक म्हणुन पी उत्तर वॉर्ड येथे कार्यरत होते. अनुज्ञापन खाते मुख्यालय दादर येथून त्यांची मुंबईमध्ये वेगवेगळया ठिकाणी बदली होत होती ती खालीलप्रमाणे:—

| अ. क्र. | पद | कालावधी | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | लिपीक | २५/१०/१९९६ ते ३१/०३/२००८ | सुरक्षा दल खाते, भायखळा |
| २ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०४/२००८ ते ३१/१२/२००८ | टी वॉर्ड मुलुंड (पश्चिम) |
| ३ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२००९ ते ३१/१२/२००९ | जी उत्तर वॉर्ड, दादर (प.) |
| ४ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२०१० ते ३१/१२/२०१० | जी साऊथ, प्रभादेवी |
| ५ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२०११ ते ३१/१२/२०११ | ए वॉर्ड, सीएसटी. |
| ६ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२०१२ ते ३१/१२/२०१२ | एफ उत्तर वॉर्ड माटुंगा पु |
| ७ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२०१३ ते ३१/१२/२०१३ | एल वॉर्ड, कुर्ला (प), |
| ८ | अनुज्ञापन निरिक्षक (वाहन) | ०१/०१/२०१४ ते २८/०२/२०१५ | आर उत्तर वॉर्ड, दहिसर (प), |
| ९ | अनुज्ञापन निरिक्षक (जाहीरात) | ०१/०१/२०१५ ते १५/१०/२०१८ | एम पश्चिम वॉर्ड, चेंबुर (प), |
| १० | अनुज्ञापन निरिक्षक, (जाहीरात) | १५/१०/२०१८ ते १५/०२/२०२१ | पी उत्तर वॉर्ड, मालाड (प) |

Scanned by Scanner Go

उघड चौकशीमध्ये केलेल्या सविस्तर चौकशीमध्ये गैरअर्जदार यांचे एकूण उत्पन्न, एकूण खर्च, एकूण स्थावर व जंगम मालमत्तेसंदर्भातील सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

आरोपी लोकसेवक श्री.नितीन गणपत पाटणकर यांची मालमत्ता, उत्पन्न व खर्च बाबत सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे.

(अ)—परिक्षण कालावधीपुर्वीची स्थावर/जंगम मालमत्ता— रु.००/—

(ब)—परिक्षण कालावधीतील स्थावर/जंगम मालमत्ता— रु. ४०,११,४६२.७४/—

| क्र. | (अ)—परिक्षण कालावधी पुर्वीची स्थावर मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|
| | निरंक | ०० |

| | (अ—१)—परिक्षण कालावधीपुर्वीची जंगम मालमत्ता तपशील— | किंमत |
|---|---|---|
| | निरकं | ०० |
| | परिक्षण पुर्वीची एकूण स्थावर व जंगम मालमत्ता रक्कम.... | ०० |

| | (ब)—परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता तपशील | किंमत |
|---|---|---|
| ०१ | आलोसे यांनी दिनांक ०९/०८/२००४ रोजी वेलुबेन गांगजी छाडवा यांच्या कडून बी/६०३, आरियल टॉवर, भट्टीपाडा रोड भांडूप (प.) मुंबई ४०००७८ विकत घेतलेली सदनिका. | ९,५०,०००/— |
| ०२ | आलोसे यांनी दिनांक ०८/०९/२०१७ रोजी श्री. संदीप शिवशंकर पांडे यांच्या कडून रूम नं.५९, विद्या निवास चाळ, नॅशनल शाळे जवळ, भटटीपाडा रोड, भांडूप (प) विकत घेतलेली सदनिका | १८,००,०००/— |
| | परिक्षण कालावधीमधील स्थावर मालमत्ता रक्कम..... | २७,५०,०००/— |

| | (ब—१)—परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता— | १२,६१,४६२.७४/— |
|---|---|---|
| ०१ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३६९३३४४९७३ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | १,१४५/— |
| ०२ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७८९०९१११९ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | ९,०१२.३/— |
| ०३ | बँक ऑफ महाराष्ट्र, भांडूप (प) गै.अ. व त्यांच्या पत्नी यांच्या नावे जॉईट (सॅलरी), बचत खाते क्रमांक २००८०७७३८३९ मध्ये शेवटी जमा असलेली रक्कम. | १,६३,०९१.४६/— |
| ०४ | अभ्युदय कॉ.ऑप.बँक जॉईट /बचत खाते क्रं. एसबी/६६१५ (०२९०१११००००६६१५) खात्यावर जमा असलेले शेवटची रक्कम. | ८३,९२१.९८/— |
| ०५ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७८४०३८८५ खात्यावर जमा असलेल शेवटची रक्कम. | २,४२४/— |
| ०६ | सेन्ट्रल बँक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७९६६४५५३ खात्यावर जमा असलेली शेवटची रक्कम. | २,३६७/— |

समक्ष
[signature] २।२।२२

[signature]

Scanned by Scanner Go

| | | |
|---|---|---|
| ०७ | म्युन्सीपल को. ऑप. बँक, मुंबई , खाते क्रं. ३०१०००००२८७ ५३१७ या खात्यावर जमा असलेली रक्कम. | १,३५,५२६/— |
| ०८ | म्युन्सीपल को. ऑप. बँक, मुंबई , खाते क्रं. ३०१०००००२८७ ५३०६ या खात्यावर जमा असलेली रक्कम. | २,५८१/— |
| ०९ | म्युन्सीपल को. ऑप. बँक, मुंबई , खाते क्रं. ३०१०००००२८७ ५२९३ या खात्यावर जमा असलेली रक्कम. | १००/— |
| १० | म्युन्सीपल को. ऑप. बँक, मुंबई , खाते क्रं. ३०१०००००७३२ ७३९८ या खात्यावर जमा असलेली रक्कम. | ४०,१५४/— |
| ११ | म्युन्सीपल को. ऑप. बँक, मुंबई, खाते क्रं. ३०१०००००२८ ६९४६१ या खात्यावर जमा असलेली रक्कम. | ६,३२५/— |
| १२ | कोटक लाईफ इन्शुरन्स करिता केलेला खर्च. | ३,०९,२५१/— |
| १३ | आलोसे नितीन गणपत पाटणकर यांच्या मासिक वेतनातून कपात करण्यात आलेली एल.आय.सी.पॉलिसी. | ००/— |
| १४ | आलोसे नितीन गणपत पाटणकर यांच्या नावे असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक २००८०७७३८३९ मधून (सॅलरी खाते) कपात करण्यात आलेली एल.आय.सी.पॉलिसी. | ८६,५६४/— |
| १५ | आलोसे पाटणकर यांनी रामानंद मल्टीस्टेट को.ऑप.हौ.सोसा.लि. मध्ये केलेली मासिक गुंतवणूक. | १,७५,१००/— |
| १६ | आलोसे पाटणकर नविन घेतलेली होंडा कंपनीची स्कुटर. | ६३,५००/— |
| १७ | आलोसे पाटणकर यांच्या घरझडतीमध्ये मिळून आलेली जंगम मालमत्ता. | १,२२,८००/— |
| १८ | आलोसे पाटणकर यांनी खरेदी केलेला सॅमसंग कंपनीचा ए५१ मोबाईल फोन | २४,१००/— |
| १९ | आलोसे पाटणकर यांच्या पत्नी श्रीमती ज्योती नितीन पाटणकर यांनी खरेदी केलेला विवो कंपनीचा मॉडेल १७१४ मोबाईल फोन. | १२,०००/— |
| २० | आलोसे पाटणकर यांचा मूलगा प्रेम नितीन पाटणकर यांनी खरेदी केलेला ओपो कंपनीचा मॉडेल नं. प्रो १७ मोबाईल फोन. | २१,५००/— |
| | **परिक्षण कालावधीमधील जंगम मालमत्ता रक्कम** | १२,६१,४६२.७४/— |
| | **परिक्षण कालावधीअखेरीस असलेली एकूण स्थावर व जंगम मालमत्ता रक्कम..** | ४०,११,४६२.७४/— |

(क) आलोसे नितीन गणपत पाटणकर यांच्या उत्पन्नाचा तपशिल रु. ८५,५५,८१९.१/—

| क्र. | (क)— उत्पन्नाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | आलोसे नितीन गणपत पाटणकर यांना शासकिय नोकरीतील निव्वळ वेतन व भत्ते | ५४,४१,९६७.५४/— |

साक्षी [signature] २/२/२२

[signature]

Scanned by Scanner Go

| | | |
|---|---|---|
| ०२ | आलोसे यांनी दिनांक ०८/१०/२००४ रोजी बी/६०३, आरीयल टॉवर, नॅशनल शाळेजवळ, भटटीपाडा रोड, भांडुप (प), मुंबई ही सदनिका खरेदी करताना सहारा हाऊसिंग फायनान्स प्रा.लि., अंधेरी यांच्याकडून घेतलेले कर्ज. | ५,००,०००/- |
| ०३ | आलोसे यांनी दिनांक ०७/०९/२०१७ रोजी रूम नं. ५९ विद्या निवास चाळ, नॅशनल शाळेजवळ, भटटीपाडा रोड, भांडुप (प), मुंबई ही सदनिका खरेदी करण्याकरिता सेंट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प) यांच्याकडून घेतलेले कर्ज. खाते क्रं.३६३२२५९३३१ | १६,३८,०००/- |
| ०४ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३६९३३४४९७३ खात्यावर मिळालेले एकूण व्याज | १४५/- |
| ०५ | बॅक ऑफ महाराष्ट्र, भांडूप (प) गै.अ. व त्यांच्या पत्नी यांच्या नावे जॉईट (सॅलरी), बचत खाते क्रमांक २००८०७७३८३९ मिळालेले व्याज. | ४४,१०४/- |
| ०६ | अभ्युदय को.ऑप.बॅक जॉईट /बचत खाते क्रं. एसबी/६६१५ (०२९०१११००००६६१५) खात्यावर मिळालेले एकूण व्याज | २४,७९९/- |
| ०७ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७८९०९१११९ खात्यावर जमा मिळालेले एकूण व्याज | २,७७४/- |
| ०८ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७८४०३८८५ खात्यावर मिळालेले व्याज. | ४२४/- |
| ०९ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३५७९६६४५५३ खात्यावर मिळालेले एकूण व्याज | १९३/- |
| १० | म्युन्सीपल को. ऑप. बॅक, मुंबई , खाते क्रं. ३०१००००००२८७ ५३१७ या खात्यावर खात्यावर मिळालेले व्याज. | ५०,८७६.५६/- |
| ११ | म्युन्सीपल को. ऑप. बॅक, मुंबई, खाते क्रं. ३०१००००००७३२ ७३९८ या खात्यावर खात्यावर मिळालेले व्याज. | ११,८८२/- |
| १२ | म्युन्सीपल को. ऑप. बॅक, मुंबई, खाते क्रं. ३०१००००००२८६ ९४६१ या खात्यावर खात्यावर मिळालेले व्याज. | ३,२००/- |
| १३ | गै.अ. यांनी रामानंद मल्टीस्टेट को.ऑप. क्रडिट सोसा.लि. मध्ये केलेली मासिक गुंतवणूकीवर मिळालेले व्याज. | ६३०/- |
| १४ | आलोसे नितीन गणपत पाटणकर यांच्या नावे असलेल्या मनी बॅक पॉलिसीचा परतावा. | १,३६,८२४/- |
| १५ | आलोसे नितीन गणपत पाटणकर यांनी श्री.जितेंद्र शंकर राजमाने यांना रूम नं.२६,विश्वकर्मा सदन चाळ, भांडूप पोलीस चौकी जवळ टेंभीपाडा, भांडूप (प.) येथील विकलेली रूम. | ७,००,०००/- |
| | **एकूण उत्पन्न रक्कम रूपये :-** | ८५,५५,८१९.१/- |

Scanned by Scanner Go

(ड) आलोसे नितीन गणपत पाटणकर यांच्या खर्चाचा तपशिल रू. ८३,७३,५८२.०१/—

| | (ड)— खर्चाचा तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | वेतनाच्या १/३ नाशाबीतीचा गृहखर्च ( स्थुल वेतनातुन आयकर वजा जाता ) | २४,३५,०३६/— |
| ०२ | आयकर विभागास अदा केलेली पगारातील आयकर | ००/— |
| ०३ | बी/६०३, आरियल टॉवर, भट्टीपाडा, रोड भांडूप (प.) मुंबई ४०००७८ विकत घेताना भरलेला मुद्रांक शुल्क व नोंदणी फि. | २८,०००/— |
| ०४ | बी/६०३, आरियल टॉवर, भट्टीपाडा, रोड भांडूप (प.) मुंबई ४०००७८ हि सदनिका खरेदी करताना सहारा हाऊसिंग फायनान्स कडून घेतलेल्या कर्जाची परत फेड केलेली मुद्दल रक्कम व सदर कर्जावर दिलेले व्याज. | ८,२६,८००/— |
| ०५ | बी/६०३, आरियल टॉवर, भट्टीपाडा, रोड भांडूप (प.) मुंबई ४०००७८ विकत घेतलेल्या सदनिकेच्या डागडूजी करिता व फर्निचर करिता झालेला खर्च. | २,५०,०००/— |
| ०६ | आलोसे यांनी रूम नं.५९, विद्या निवास चाळ, नॅशनल शाळे जवळ, भटटीपाडा रोड, भांडूप (प) ही सदनिका घेताना संदीप शिवशंकर पांडे यांना कर्जाव्यतीरिक्त दिलेली रक्कम. | १,६२,०००/— |
| ०७ | सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, भांडूप (प), खाते क्रमांक ३६३२२५९३३१ खात्यावर घेतलेले कर्जाची कर्जफेड केलेली मुद्दल रक्कम व व्याज. | १७,३९,९९८.११/— |
| ०८ | गै.अ. यांच्या मुलगा व मुलीचा शिक्षणाचा एकूण खर्च | ८,८६,२८१/— |
| ०९ | बी/६०३, आरियल टॉवर, भट्टीपाडा, रोड भांडूप (प.) मुंबई ४०००७८ सदनिकेचा देखभाल खर्च | २,३१,३२७/— |
| १० | १/३ नाशाबीतीचा खर्चा व्यतीरिक्त बॅकेतून केलेला इतर खर्च. | ११,७२,९८९.९/— |
| ११ | आलोसे नितीन गणपत यांनी कांचन ज्वेलर्स, शॉप नं. ०१, साळुंखे सदन, भट्टीपाडा रोड, जैन मंदिर जवळ, भांडूप (प) मुंबई—७८ यांच्याकडून खरेदी केलेले सोने. | ६,४१,१५०/— |
| | **एकूण खर्च रक्कम रूपये :—** | ८३,७३,५८२.०१/— |

नितीन पाटणकर यांचे ''उत्पन्न'', ''खर्च'' व ''मालमत्ता'' याबाबत एकत्रित स्थिती खालीलप्रमाणे निष्पन्न झालेली आहे.

| अपसंपदेची गणना तपशिल | | | |
|---|---|---|---|
| १ | परिक्षण कालावधीमधील मालमत्ता | (विधान 'ब') | ४०,११,४६२/— |
| २ | परिक्षण कालावधीपुर्वीची मालमत्ता | (विधान 'अ') | ००/— |
| ३ | परिक्षक कालावधी एकूण मालमत्ता | (ब—अ) | ४०,११,४६२/— |

समक्ष
फिर्यादी / [signature]

[signature]

Scanned by Scanner Go

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | परिक्षण कालावधी एकुण खर्च | (विधान 'ड') | ८३,७३,५८२/— |
| ५ | परिक्षण कालावधी एकुण मालमत्ता व खर्च | ( ३+४ ) | १,२३,८५,०४४/— |
| ६ | परिक्षक कालवधी एकुण उत्पन्न | (विधान 'क') | ८५,५५,८१९/— |
| ७ | अपसंपदा | (५—६) ( DA ) | ३८,२९,२२५/— |
| ८ | अपसंपदेची टककेवारी DA / TOTAL INCOME *100 | | ४४.७६ % |

सदर उघड चौकशीमध्ये गैरअर्जदार नितीन पाटणकर यांच्या सर्व प्रकारच्या ज्ञात स्त्रोतातून मिळालेल्या उत्पन्नाचा विचार करून अपसंपदेची गणना केली असता गैरअर्जदार नितीन पाटणकर यांची नमूद मालमत्ता ज्ञात उत्पन्नाच्या प्रमाणाशी विसंगत अशी रुपये ३८,२९,२२५/— म्हणजे (४४.७६%) इतकी अपसंपदा गैरमार्गाने संपादित केलेली असल्याचे चौकशी अंती निर्दशनास आले.

तरी गैरअर्जदार नितीन गणपत पाटणकर, अनुज्ञापन निरीक्षक, पी वॉर्ड, मालाड मुंबई यांनी वर नमूदप्रमाणे भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशीर आणि ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किमंतीची मालमत्ता संपादित केली आहे म्हणून **भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम १३ (१) (इ) व कलम १३ (१) (ब) सह कलम १३ (२)** अन्वये माझी सरकारतर्फे त्यांचे विरुध्द तक्रार आहे.

माझी फिर्याद वाचून पाहिली असता माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

[signature] 2/2/22

नितीन प्रभाकर दळवी
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

[signature] 02/02/2022

शिवराज ज. म्हेत्रे.
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

Scanned by Scanner Go